## नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०११ मधील निशाण क्र.१०९ खालील आदेश

[ CNR No.MHKO090001382011 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३क आणि ३इ यांनी विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी सादर केला आहे. सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, त्यांना सदर दाव्यासंबंधी काहीही माहिती नव्हती, प्रस्तूत प्रतिवादी यांचे वडील सर्व काम पाहत होते त्यामुळे सर्व कागदपत्रे प्रस्तूत प्रतिवादी यांच्या वडिलांकडे होती, प्रस्तूत प्रतिवादी हे वडिलांबरोबर राहत नसलेने त्यांना कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत व सर्व माहिती वकिलांना देवू शकले नाहीत. त्यामुळे कैफियत सादर करणेस विलंब झाला. तरी प्रतिवादी क्र.३क आणि ३इ विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, प्रस्तूत प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज हा असंदिग्ध कारणे सादर करून दाखल केला आहे त्यामुळे तो स्विकारार्ह नाही. तसेच अर्जातील कारणांना सबळ असा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सबब सदरचा अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा.

३. अर्ज व म्हणणे तसेच संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल करणेत आला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकरिता प्रतिवादींची बाजू न्यायालयासमक्ष येणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तूत प्रतिवादींविरुध्दचा विना–कैफियतचा आदेश रद्द केलेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी क्र.३क आणि ३इ यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांची कैफियत स्विकारणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.10.18 10:41:01 +0530

स्थळ : गडहिंग्लज. ( न. श्री. पुरी )

दिनांक : १७.१०.२०२५. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज